**आकाशवाणी मुंबई**

**प्रादेशिक बातम्या देत आहे.**

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्य मंत्रिमंडळाच्या खातेवाटपात गृह खातं मुख्यमंत्र्यांकडेच / अजित पवारांना अर्थखातं, तर एकनाथ शिंदे यांच्याकडे नगरविकास
- सरकारी विभागांमध्ये नवनियुक्त ७१ हजारांहून अधिक उमेदवारांना उद्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी नियुक्तीपत्र प्रदान करणार
- पुढच्या वर्षी होणाऱ्या कनिष्ठ गट नेमबाजी विश्वचषक स्पर्धेचं यजमानपद भारताकडे

**आणि**

- १९ वर्षांखालच्या मुलींच्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात बांगलादेशाला नमवून भारतानं पटकावलं विजेतपद

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाचं खातेवाटप काल जाहीर झालं. गृह आणि ऊर्जा खातं तसंच विधी आणि न्याय, सामान्य प्रशासन, माहिती आणि जनसंपर्क खातं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःकडे ठेवलं असून, उपमुख्यमंत्री अजित पवार यांना वित्त आणि नियोजन तसंच राज्य उत्पादन शुल्क खातं तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना नगरविकास, गृहनिर्माण आणि सार्वजनिक बांधकाम खाते (सार्वजनिक उपक्रम) देण्यात आलं आहे. जलसंपदा विभागाची जबाबदारी राधाकृष्ण विखे पाटील आणि गिरीश

महाजन यांच्याकडे विभागून देण्यात आली आहे. चंद्रशेखर बावनकुळे यांना महसूल विभागाची जबाबदारी देण्यात आली आहे.

हसन मुश्रीफ यांना वैद्यकीय शिक्षण,

उदय सामंत - उद्योग आणि मराठी भाषा,

चंद्रकांत पाटील - उच्च आणि तंत्रशिक्षण तसंच संसदीय कार्य विभाग,

गिरीश महाजन - आपत्ती व्यवस्थापन,

गुलाबराव पाटील - स्वच्छता आणि पाणीपुरवठा,

अदिती तटकरे - महिला आणि बालकल्याण,

गणेश नाईक - वनविभाग,

माणिकराव कोकाटे - कृषी,

प्रकाश आबिटकर - सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण,

जयकुमार गोरे - ग्रामीण विकास आणि पंचायत राज,

दादा भुसे - शालेय शिक्षण,

संजय राठोड - मृदा आणि जलसंधारण,

शंभुराज देसाई - पर्यटन, खनिकर्म आणि माजी सैनिक कल्याण मंत्रालय,

नितेश राणे - बंदरे आणि मत्स्यव्यवसाय,

दत्ता भरणे - क्रीडा आणि युवक कल्याण तसंच अल्पसंख्याक विकास,

तर शिवेंद्रसिंहराजे भोसले यांना सार्वजनिक बांधकाम खातं (सार्वजनिक उपक्रम वगळून) दिलं आहे.

मंगलप्रभात लोढा यांना कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता,

जयकुमार रावल यांना पणन आणि राजशिष्टाचार तसंच आदिवासी विकास, तर आशिष शेलार हे माहिती आणि तंत्रज्ञान, सांस्कृतिक खात्याचे मंत्री असतील.

धनंजय मुंडे यांना अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण,

पंकजा मुंडे - पर्यावरण, वातावरणीय बदल आणि पशुसंवर्धन,

अतुल सावे - इतर मागासवर्गीय तसंच बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपरिक उर्जा

अशोक उईके - आदिवासी विकास,

नरहरी झिरवाळ  अन्न आणि औषध प्रशासन, विशेष सहाय्य

संजय सावकारे - वस्त्रोद्योग,

संजय शिरसाट - सामाजिक न्याय विभाग,

प्रताप सरनाईक - परिवहन,

तर, भरत गोगावले यांच्याकडे रोजगार हमी, फलोत्पादन, खारभूमी विकास खातं देण्यात आलं आहे.

राज्यमंत्र्यांमध्ये

आशिष जयस्वाल - वित्त, नियोजन, कृषी, मदत आणि पुनर्वसन, विधी आणि न्याय, कामगार,

माधुरी मिसाळ - नगरविकास, परिवहन, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ.

पंकज भोयर - गृह ( ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार, खनिकर्म.

मेघना बोर्डीकर - सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण, पाणीपुरवठा आणि स्वच्छता, ऊर्जा, महिला आणि बालविकास, सार्वजनिक बांधकाम ( सार्वजनिक उपक्रम).

इंद्रनील नाईक - उद्योग, सार्वजनिक बांधकाम, उच्च आणि तंत्रशिक्षण, आदिवासी विकास, पर्यटन, मृदा आणि जलसंधारण.

योगेश कदम - गृह (शहरी) महसूल, ग्रामविकास आणि पंचायतराज, अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन

**<><><><><>**

देशभरात विविध सरकारी मंत्रालये आणि विभागांमध्ये नवनियुक्त ७१ हजारांहून अधिक उमेदवारांना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या दूरदृश्य प्रणालीद्वारे नियुक्तीपत्र प्रदान करणार आहेत. यावेळी ते उमेदवारांना संबोधितही करणार आहेत. रोजगार मेळावा हा प्रधानमंत्र्यांच्या रोजगार निर्मितीला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या वचनाची पूर्तता करण्याच्या दिशेनं एक पाऊल आहे. हा उपक्रम युवकांना राष्ट्रनिर्माणाबरोबरच आत्मनिर्भर होण्याची संधी उपलब्ध करून देईल, असं सरकारतर्फे कळवण्यात आलं आहे. हा रोजगार मेळावा देशभरातील ४५ ठिकाणी आयोजित केला जाणार आहे. केंद्रीय सरकारच्या विविध मंत्रालये आणि विभागांसाठी भरती केली जात आहे. देशभरातून निवडलेले नवे उमेदवार गृह मंत्रालय, टपाल कार्यालय, उच्च शिक्षण विभाग, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, वित्तीय सेवा विभाग यांसारखी विविध मंत्रालये/विभागांमध्ये नियुक्त होतील.

**<><><><><>**

भारत पुढल्या वर्षी कनिष्ठ गट नेमबाजी विश्वचषक स्पर्धेचं यजमानपद भूषवणार आहे. भारत प्रथमच या स्पर्धेचं यजमानपद भूषवणार असून पुढल्या वर्षाच्या उत्तरार्धात ही स्पर्धा होईल. भारतीय राष्ट्रीय रायफल संघ ही स्पर्धा आयोजित करणार असून यात रायफल, पिस्तूल आणि शॉटगन प्रकारात स्पर्धा होतील. गेल्या दशकभरात भारतात आयोजित ही नववी मोठी नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धा आहे. यापूर्वी भारतानं आंतरराष्ट्रीय नेमबाजी क्रीडा महासंघाच्या सहा स्पर्धा आयोजित केल्या आहेत.

**<><><><><>**

१९ वर्षांखालच्या मुलींच्या आशिया चषक क्रिकेट टी-ट्वेंटी स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारतानं बांग्लादेशला ४१ धावांनी पराभूत करत विजेतेपद पटकवलं आहे. भारतीय महिला संघानं या स्पर्धेतले सर्व सामने जिंकत दणदणीत विजय मिळवून इतिहास रचला. मलेशियातल्या क्वालालंपूर इथं आज सकाळी झालेल्या या सामन्यात, बांग्लादेशनं नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारतानं प्रथम फलंदाजी करत २० षटकांत सात बाद ११७ धावा केल्या. गोंगाडी त्रिशा हिनं ४७ चेंडूत ५२ धावा केल्या. विजेतेपदासाठी ११८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, बांगलादेशचा संघ १८ षटकांत ७६ धावांवर गारद झाला. भारताकडून आयुषी शुक्लानं तीन बळी घेतले, तर परुनिका सिसोदिया आणि सोनम यादव यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले. त्रिशा हिला सामनावीर आणि मालिकावीर असे दोन्ही किताब देण्यात आले.

**<><><><><>**

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात महिलांच्या आयसीसी एकदिवसीय क्रिकेट मालिकेतला पहिला सामना आज वडोदरा इथे सुरू आहे. या सामन्यात भारतीय संघाची धुरा पुन्हा हरमनप्रीत कौर हिच्यावर आहे. सामन्यात नाणेफेक जिंकून वेस्ट इंडिजने प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या २३ षटकांत १ बाद ११० धावा झाल्या आहेत.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून रविचंद्रन अश्विन यांनी निवृत्ती जाहीर केल्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांना भावनिक पत्र लिहिलं आहे. क्रिकेट आणि देशासाठी अश्विन यांनी दिलेल्या अतुलनीय योगदानाबद्दल प्रधानमंत्र्यांनी त्यांचे आभार मानले आहेत. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये घेतलेले ७६५ बळी आणि कसोटीत सर्वाधिक मालिकावीर पुरस्कार या अश्विन यांच्या विक्रमावर प्रकाश टाकताना, मोदींनी त्यांच्या गोलंदाजीतील विविधता आणि प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व गाजवण्याच्या क्षमतेचे कौतुक केले. प्रधानमंत्री मोदींनी आपल्या पत्रात अश्विनच्या १४ वर्षांच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतल्या महत्त्वाच्या क्षणांचा उल्लेख केला. अश्विनच्या क्रिकेट कारकिर्द भविष्यातल्या पिढ्यांना प्रेरणा देईल अशी आशा व्यक्त केली.

**<><><><><>**

भारत पाच ट्रिलियन-डॉलर अर्थव्यवस्थेचं उद्दिष्ट साध्य करताना महाराष्ट्रही देशात अग्रेसर राहील, असं राज्याच्या मंत्री आदिती तटकरे यांनी म्हटलं आहे. केंद्रीय अर्थमंत्री सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली काल जैसलमेर इथं केंद्रीय अर्थसंकल्पपूर्व बैठक झाली त्यावेळी तटकरे बोलत होत्या. यात

२०२५-२६ च्या प्रस्तावित केंद्रीय अर्थसंकल्पातील निधी वाटप, दृष्टिक्षेपासह विविध मागण्यांवर राज्यांच्या अर्थमंत्र्यांमध्ये चर्चा झाली. तटकरे यांनी महाराष्ट्रातील कृषी, आरोग्य, पायाभूत सुविधांससह विविध विकास धोरणांबाबत शासनाच्या प्रस्तावांची रूपरेषाही यावेळी मांडली.

**<><><><><>**

बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक म्हणून नवनीत कॉवत यांनी काल पदभार स्वीकारला. मस्साजोग हत्या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रलंबित कामं लवकरच पूर्ण केली जातील, असं कॉवत यांनी आज पत्रकार परिषदेत सांगितलं. जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावं अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. कोणतीही अडचण असेल तर नागरिकांनी आपल्याला भेटून सांगावी असं आवाहन कॉवत यांनी केलं.

**<><><><><>**

राज्यात आजही हवामान कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे. राज्यात या सरत्या वर्षाच्या शेवटापर्यंतच्या आठ दिवसांच्या कालावधीत बहुतांश भागात वातावरण काही अंशी ढगाळ असणार आहे तर काही ठिकाणी तुरळक पावसाचीही शक्यता आहे.

दरम्यान, सूर्याच्या उत्तरायणाला काल २१ डिसेंबरला प्रारंभ झाला. इथून पुढे हळूहळू दिवसाचा कालावधी वाढत जातो. सूर्य काल मकरवृत्तावर असल्यानं कालचा डिसेंबरचा दिवस हा सर्वात लहान म्हणजे अकरा तासांचा

तर, रात्र तेरा तासांची होती. उत्तर गोलार्धात हिवाळा सुरू झाल्यानंतर दिवस लहान तर रात्र मोठी होते.

//<><><><><>//